संक्षिप्त खटला क्र. ३९३/१९
अमोल पाटील वि. महेंद्र घाग.

## निशाणी क्र.१ वरील आदेश

(CNR No. MHRG090007472019)

१. फिर्यादपत्रक, फिर्यादीची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २०० ची तपासणी नि.क्र.५ व फिर्यादसोबतची कागदपत्रे विचारात घेतली. फिर्यादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. डी. एम. वर्मा यांचा युक्तिवाद ऐकला.

२. फिर्याद, फिर्यादीच्या शपथेवर नोंदवलेल्या पडताळणीवरुन आरोपीने दि. २८.०७.२०१९ रोजीचा रक्कम रु.१,२५,०००/- चा त्याच्या आय. डी. बी. आय. बँक, शाखा रोहा, खाते क्र. १५९७१०९००००५८८७१ वरील धनादेश क्र.००१२०८ फिर्यादीला कायदेशीर जबाबदारी फेडण्यासाठी दिल्याचे दिसते. सदर धनादेश फिर्यादीने त्याचे एच. डी. एफ. सी. बँक, शाखा रोहा येथील त्याच्या खात्यात वटवण्यासाठी सादर केला असता सदर धनादेश न वटता बँकेच्या 'अपुरा निधी' या शेऱ्यासह परत आल्याचे दिसते.

३. फिर्यादीने आरोपीला दि.१४.८.२०१९ रोजी पाठवलेली नोटीस आरोपीला दि.१९.८.२०१९ रोजी मिळाली. आरोपीने नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसात फिर्यादीला धनादेशाची रक्कम दिली नाही. म्हणून आरोपीने प्रथमदर्शनी चलनक्षम दस्तऐवज अधिनियमए १८८१ चे कलम १३८ अन्वये दंडनीय अपराध केल्याचे दिसते. म्हणून आरोपीविध्द आदेशीका जारी करण्यास पुरेसे कारण आहे अशी माझी खात्री झाली आहे. या कारणास्तव  खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

(अ) आरोपीविरुध्द फौ.प्र.सं., १९७३ चे कलम २०४ अन्वये चलनक्षम दस्तऐवज अधिनियम, १८८१ चे कलम १३८ नुसार दंडनीय अपराधासाठी आदेशीका जारी करण्यात येते.

(आ) फिर्याद फौजदारी संक्षिप्त खटला नोंदवावी. आरोपीला समन्स काढावे.

(इ) मा. सर्वोच्च न्यायालयाने दामोदर एस. प्रभु वि. सय्यद बाबालाल २०१० ए.आय.आर. (एस.सी.) १९०७ मध्ये दिलेले निर्देश नोंद करावेत.

अ) आरोपीने प्रकरणात हजर झाल्यानंतर पहिल्या अथवा दुस–या तारखेला अपराध तडजोडीने मिटवण्यास अर्ज केल्यास व त्याप्रमाणे तडजोड मान्य होताना आरोपीवर कोणताही खर्च लादला जाणार नाही

.

ब) आरोपीने प्रकरणात दुस–या तारखेनंतर पुढे कोणत्याही टप्प्यावर अपराध तडजोडीने मान्य केला तर फिर्यादीत नमूद धनादेशाच्या १० टक्के रक्कम मा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड यांच्याकडे जमा करण्यासाठी या न्यायालयात भरण्याची अट लादण्यात येईल व अपराध तडजोडीने या अटींची पुर्तता केल्यानंतरच मिटेल.

क) आरोपीला पुढे असेही सुचित करण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाने नमुद प्रकरणात दिलेल्या निर्देशानुसार मा. उच्च न्यायालय अथवा मा. सत्र न्यायालयात अपील अथवा रिव्हीजन दाखल झाल्यानंतर तडजोड करायची असल्यास फिर्यादीत नमुद धनादेशाच्या १५ टक्के रक्कम भरावी लागेल.

ड) आरोपीने मा. सर्वोच्च न्यायालयात अपिल अथवा रिव्हीजन दाखल झाल्यावर तडजोड करायची असल्यास फिर्यादीत नमुद धनादेशाच्या २० टक्के रक्कम भरावी लागेल.

---स्वाक्षरी---

दि.१८.०९.२०१९

(स. दि. कमलाकर)
प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, रोहा.